Phon No. -020-26123066/67 Email:mscepune@gmail.com Website:www.mscepune.in

**परीक्षा प्राधान्य**

क्र.मरापप/राप्रशो/2015-16/स-3/
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
17, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-1.
दिनांक : 15/03/2016.

प्रति,

**मा. प्रसिद्धी महासंचालक,**
प्रसिद्धी संचालनालय,
मंत्रालय विस्तारभवन,
मुंबई- 400 032.

**विषय : राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा (राज्यस्तर) 2015-16**
**इ. 10 वी साठी परीक्षा दि. 08 नोव्हेंबर 2015**
**राज्यस्तरीय NTS परीक्षेतून राष्ट्रीयस्तर परीक्षेसाठी निवड यादी प्रसिद्धीबाबत.**

महोदय,

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-1. यांचे मार्फत राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा NTS (राज्यस्तर) इ. 10 वी साठी परीक्षा दि. 08 नोव्हेंबर 2015 रोजी घेण्यात आली. सदर परीक्षेमधून राष्ट्रीयस्तर NTS परीक्षेसाठीची निवड यादी व शाळानिहाय गुणयादी **मंगळवार दिनांक 15/03/2016 रोजी दुपारी 3.00 वाजता** घोषित होणार आहे त्याचे "प्रसिद्धी निवेदन" सोबत जोडले आहे.

कृपया सदर वृत्तास विनामूल्य प्रसिद्धी द्यावी ही विनंती.

आपला विश्वासू,

(रा. वि. गोधने)
**आयुक्त,**
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-1.

**प्रत :**
मा. प्रसिद्धी उपसंचालक,
प्रसिद्धी विभाग, मध्यवर्ती इमारत, पुणे-1.

## प्रसिद्धी निवेदन

### राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा (राज्यस्तर)

### इ. 10 वी दि. 08 नोव्हेंबर, 2015 ची निवड यादी व शाळानिहाय गुणयादी

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचे मार्फत 08 नोव्हेंबर 2015 रोजी घेण्यात आलेल्या **राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा (राज्यस्तर) इ. 10 वी** परीक्षेची **निवड यादी व शाळानिहाय गुणयादी मंगळवार दिनांक 15/03/2016 रोजी दुपारी 3.00 वाजता** जाहीर होणार आहे.

**NTS** इ. 10 वी परीक्षेसाठी **76148** विद्यार्थी नोंदविण्यात आले. **NTS** राष्ट्रीय परीक्षेसाठी महाराष्ट्र राज्यातून परीक्षेमधून 366 विद्यार्थी कोटा एन.सी.ई.आर.टी., नवी दिल्ली यांचेकडून निश्चित केला आहे. त्यामध्ये सर्वसाधारण गटातील 284, अनुसूचित जाती 55 व अनुसूचित जमाती 27 अशा एकूण 366 विद्यार्थ्यांची निवड करण्यात येते. संबंधित संवर्गातील समान गुणांचे विद्यार्थी समाविष्ट करुन 387 विद्यार्थ्यांची निवड यादी प्रसिध्द करण्यात येत आहे. तसेच संबंधित संवर्गात अपंगासाठीचे 3% आरक्षण समाविष्ट आहे. ज्या विद्यार्थ्यांची निवड जात/अपंगत्व आरक्षणातून झालेली आहे त्यांनी सदरचे प्रमाणपत्राची सत्यप्रत प्रवेशपत्रासोबत एन.सी.ई.आर.टी., नवी दिल्ली यांना सादर केल्याशिवाय त्यांची निवड कायम समजण्यात येणार नाही. निवड झालेल्या पात्र विद्यार्थ्यांची **राष्ट्रीयस्तर परीक्षा रविवार दि. 08 मे 2016 रोजी होणार आहे.** पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना त्यांचे घरच्या पत्त्यावर NCERT दिल्लीमार्फत राष्ट्रीयस्तर परीक्षेची प्रवेशपत्रे मार्चच्या शेवटच्या आठवड्यात / एप्रिल 2016 पहिल्या आठवड्यात स्पीड पोस्टाने पाठविण्यात येत आहेत. ही निवड यादी **महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वेबसाईटवर मंगळवार दिनांक 15/03/2016 रोजी दुपारी 3.00 वाजल्यापासून पाहता येईल.** वेबसाईटचा पत्ता **www.mscepune.in** हा आहे.

राष्ट्रीयस्तर परीक्षेतून गुणवत्ताधारक ठरलेले विद्यार्थी 'शिष्यवृत्तीधारक' होतील. राष्ट्रीय पातळीवर **NTS** इ. 10 वी साठी सन 2015-16 पासून 2000 शिष्यवृत्त्या देण्यात येतील. त्यापैकी या परीक्षेच्या आतापर्यंत एकूण संख्येच्या साधारण 20% शिष्यवृत्त्या महाराष्ट्रातील विद्यार्थी मिळवतात. सदरची शिष्यवृत्ती अत्यंत प्रतिष्ठेची मानण्यात येते.

गतवर्षी महाराष्ट्रातून सदर परीक्षेत राष्ट्रीयस्तरावरील 1000 पैकी 103 विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीसाठी निवड झालेली आहे ही अभिमानास्पद बाब आहे.

(रा. वि. गोधने)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-1.

E:\NEW 2012\NTS & NMMS Exam 2015-16\NTS RESULT\result declair\NTS Result 2015-16.doc

## राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा (NTS) 2015-16
## इ. 10 वी साठी राज्यस्तर परीक्षा दि. 08 नोव्हेंबर 2015 मधून राष्ट्रीयस्तर परीक्षेसाठी निवडयादी व शाळानिहाय गुणयादी बाबत...

उपरोक्त याद्या **मंगळवार दि. 15.03.2015** रोजी दुपारी 3.00 वाजता परिषदेच्या संकेतस्थळावर घोषित करण्यात येत आहेत.

1) निवड झालेल्या विद्यार्थ्यांना या कार्यालयामार्फत स्वतंत्ररित्या त्यांचे शाळेत कळविण्यात येईल.

2) राष्ट्रीयस्तरं परीक्षा दि. 08 मे 2016 रोजी होणार आहे. सदर परीक्षेची विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे मार्चच्या शेवटच्या आठवड्यात / एप्रिल 2016 च्या पहिल्या आठवड्यात स्पीड पोस्टाने पाठविण्यात येतील. नवी दिल्ली यांचेमार्फत पाठविण्यात येतील.

3) विद्यार्थ्यांना त्यांच्या राज्यस्तर परीक्षेच्या उत्तरपत्रिकांची सत्यप्रत हवी असत्यास प्रत्येक उत्तरपत्रिकेसाठी रु. 100/- चा डी. डी. सादर केल्यावर देण्यात येईल. सदरचा डी. डी. **आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-1.** यांचे नावे काढण्यात यावा. यासाठी सदरचा डी. डी. दि. 23 मार्च 2016 पर्यंत या कार्यालयास मिळणे आवश्यक आहे. त्यानंतर आलेल्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही. सदर मागणीपत्रासोबत विद्यार्थ्याने त्याच्या प्रवेशपत्राची सत्यप्रत जोडावी.

**4) आरक्षित संवर्ग / अपंगत्व आरक्षण असलेल्या विद्यार्थ्यांचे बाबतीत सदरची निवड यादी तात्पुरत्या स्वरुपाची असून संबंधित विद्यार्थ्यांनी जातीच्या व अपंगची सक्षम अधिकाऱ्यांच्या दाखल्याची सत्य प्रत NCERT नवी दिल्ली यांना प्रवेशपत्रासोबत परीक्षा केंद्रावर सादर केल्यानंतरच त्यांची निवड अंतिम समजण्यात येईल.**

(रा. वि. गोधने)

आयुक्त,

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,

पुणे-1.

**MAHARASHTRA STATE COUNCIL OF EXAMINTION, PUNE-1.**

**NATIONAL TALENT SEARCH EXAM 2015-16**

**STATE LEVEL EXAM DATE 08/11/2015**

**NATIONAL LEVEL EXAM DATE 08/05/2016**

**Statistic**

| SR. NO. | CASTE | REGISTERED | PRESENT | ABSENT | PASS | FAIL | CUT OFF MARKES OUT OF 150 | QUATA | SELECTED | NUMBER OF ADDITIONAL STUDENTS WITH SAME MARKS |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | GEN | 66817 | 62870 | 3947 | 17364 | 45506 | 113 | 284 | 305 | 21 |
| 2 | SC | 6985 | 6712 | 273 | 2000 | 4712 | 94 | 55 | 55 | 0 |
| 3 | ST | 2346 | 2224 | 122 | 474 | 1750 | 87 | 27 | 27 | 0 |
| | **Total=** | **76148** | **71806** | **4342** | **19838** | **51968** | | **366** | **387** | **21** |

**(R. V. Godhane)**

Commissioner,

Maharashtra State Council of

Examinations, Pune – 1

# राष्ट्रीय प्रज्ञाशोध शिष्यवृत्ती परीक्षा 2015-16
# राज्यस्तर परीक्षा दिनांक 08 नोव्हेंबर 2015
## राष्ट्रीयस्तर परीक्षेसाठी निवड विद्यार्थ्यांविषयीची माहिती

अ) जिल्हानिहाय राष्ट्रीयस्तरासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या

| अ.क्र | विभागाचे नाव | जिल्हा | शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी संख्या (इ. 10 वी) |
|---|---|---|---|
| 1 | मुंबई | मुंबई (दक्षिण) | 07 |
| | | मुंबई (पश्चिम) | 11 |
| | | मुंबई (उत्तर) | 13 |
| | | रायगड | 06 |
| | | ठाणे | 35 |
| | | पालघर | - |
| 2 | पुणे | पुणे | 23 |
| | | अहमदनगर | 20 |
| | | सोलापूर | 08 |
| 3 | नाशिक | नाशिक | 12 |
| | | धुळे | 06 |
| | | जळगाव | 31 |
| | | नंदूरबार | 01 |
| 4 | कोल्हापूर | कोल्हापूर | 13 |
| | | सातारा | 12 |
| | | सांगली | 07 |
| | | रत्नागिरी | 10 |
| | | सिंधुदुर्ग | 03 |
| 5 | औरंगाबाद | औरंगाबाद | 44 |
| | | जालना | 06 |
| | | बीड | 18 |
| | | परभणी | 15 |
| | | हिंगोली | - |

| अ.क्र | विभागाचे नाव | जिल्हा | शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी संख्या (इ. 10 वी) |
|---|---|---|---|
| 6 | अमरावती | अमरावती | 11 |
| | | बुलढाणा | 06 |
| | | अकोला | 12 |
| | | वाशिम | 01 |
| | | यवतमाळ | 01 |
| 7 | नागपूर | नागपूर | 15 |
| | | भंडारा | 01 |
| | | गोंदिया | 01 |
| | | वर्धा | 03 |
| | | चंद्रपूर | 01 |
| | | गडचिरोली | - |
| 8 | लातूर | लातूर | 10 |
| | | उस्मानाबाद | 01 |
| | | नांदेड | 23 |
| | | एकूण | 387 |

(सही)

(रा. वि. गोधने)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - 1

# NATIONAL TALENT SEARCH EXAM 2015-16
# STATISTICAL INFORMATION (MAHARASHTRA)

**State Level Exam 08.11.2015**

**National Level Exam 08 May 2016**

**NO OF STUDENTS Selected for National Level.**

| | **Std. X** |
|---|---|
| 1) **Medium wise Students** | |
| 1) Marathi | 170 |
| 2) English | 217 |
| **Total** | **387** |
| 2) **Syllabus wise Students** | |
| A) State Syllabus | 288 |
| B) CBSE Syllabus | 91 |
| C) ICSE Syllabus | 8 |
| **Total** | **387** |
| 3) **Sex wise Student** | |
| 1) Male | 279 |
| 2) Female | 108 |
| **Total** | **387** |
| 4) **Cast wise Student** | |
| 1) General (1) | **290** |
| 2) SC (2) | **60** |
| 3) ST (3) | **28** |
| 4) Physically Challenged | **09** |
| **Total** | **387** |

**(R. V. Godhane)**

Commissioner,

Maharashtra State Council of Examinations,

Pune - 1

E:\NEW 2012\NTS & NMMS Exam 2015-16\NTS RESULT\result decler\NTS stastics.doc